आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, २८ डिसेंबर २०२१ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ८ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## ओमायक्रॉन : काही दिलासादायक




दिल्ली : जगभरासह देशात दररोज ओमायक्रॉन व्हेरियंटच्या रुग्णाची संख्या वाढत आहे. अशातच केंद्र सरकारने स्थापन केलेल्या INS-COG (Indian SARS-Cov-2 Genomics Consortium - भारतीय सार्स सीओवी-२ जिनोमिकी समिती) या समितीने महत्वाची माहिती दिली आहे. ओमायक्रॉन देशासाठी धोकादायक असल्याचे अद्याप कोणतेही पुरावे नाहीत, असे INS-COG एका बुलेटीनमध्ये सांगितले आहे.



## संपादकीय

# ‘आधार’मुळे बोगस मतदारांना चाप

भारतातील निवडणुका पारदर्शक होण्यासाठी सरकार विविध पातळ्यांवर प्रयत्नशील आहे. भारतात जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही पद्धती आहे. एकशे तीस कोटींपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या देशात नव्वद कोटींपेक्षा जास्त मतदार आहेत. लोकसभा, विधानसभा, महापालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या अशा सतत कुठल्या ना कुठल्या निवडणुका या देशात प्रत्येक राज्यात चालू असतात. अठरा वर्षांवरील प्रत्येकाला या देशात मतदानाचा अधिकार आहे. दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत कोणाची सत्ता असावी याचा कौल मतदारराजा देत असतो. निवडून येण्यासाठी उमेदवार व त्यांचे पक्ष वारेमाप खर्च करीत असतात. लोकसभेला चाळीस–पन्नास कोटींपासून ते ऐंशी–शंभर कोटींपर्यंत, तर विधानसभेला दहा–वीस कोटींपासून पन्नास–साठ कोटींपर्यंत खर्च करणारे अनेक महाभाग असतात. मतदारांना प्रलोभने, बक्षिसे, दहा–वीस हजार रोख रकमेची पाकिटे यांचेही वाटप अनेक राज्यांत सर्रास होत असते. मग निकोप व निर्दोष निवडणूक होणार तरी कशी? ज्याच्याकडे मॅन, मनी आणि मसल पॉवर आहे, तोच निवडणुकीच्या राजकारणात उतरू शकतो. नरेंद्र मोदी यांचा राष्ट्रीय राजकारणात उदय झाल्यापासून अनेक स्वच्छ, साधीभोळी व शिकलेली माणसं निवडून येऊ लागली. एवढ्या मोठ्या देशातील निवडणुकीतील गफलती रोखण्यासाठी आणि हेराफेरीला पायबंद घालण्यासाठी कठोर उपाय योजणे, हे आवश्यकच होते. त्यासाठीच केंद्रातील मोदी सरकारने आधार कार्ड मतदार ओळखपत्राला जोडण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि निवडणूक कायद्यात सुधारणा करणारे विधेयकही संसदेच्या हिवाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहांमध्ये संमत करून घेतले. केंद्रातील मोदी सरकारने काहीही निर्णय घेतला की, त्याला विरोध करायचा हे विरोधी पक्षांचे राजकारण गेली सात वर्षे चालूच आहे. देशहिताचा व जनतेच्या सुरक्षिततेचा विचार करूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी बेधडक व धाडसी निर्णय घेत आहेत. नोटाबंदीचा निर्णय असाच त्यांनी अचानक घेतला होता. एक हजार व पाचशेच्या तत्कालीन नोटा व्यवहारातून बाद करण्याचा निर्णय हितसंबंधी लोकांना आवडला नाही. पण सामान्य जनतेने मोदींचा निर्णय मनापासून स्वीकारला होता. जम्मू–काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील कलम ३७० व कलम ३५ रद्द करण्याचा निर्णय घेण्याची हिम्मत त्यांनी दाखवली. स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांत काँग्रेस आणि बिगरभाजप सरकारांना जे जमले नाही ते मोदींनी करून दाखवले. काश्मीर हा भारताचा अविभाज्य प्रदेश आहे व तेथे देशाच्या अन्य राज्यांप्रमाणेच लोकांना अधिकार आहेत हे त्यांनी दाखवून दिले. एक देश में दो निशान, दो विधान, दो प्रधान नहीं चलेगा’ ही जनसंघाच्या स्थापनेपासूनची घोषणा होती. केंद्रातील सत्ता काबीज केल्यावर मोदींनी ती अमलात आणून दाखवली. बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्यानंतर देशात भाजपची शक्ती वाढू लागली. मंदिर वही बनायेंगे, लेकिन तारीख नहीं बतायेंगे’, अशी विरोधी पक्षांनी भाजपची कित्येक वर्षे टिंगल–टवाळी चालवली होती. पण अयोध्येत भव्य राम जन्मभूमी मंदिराची उभारणी’ हा जनसंघापासून संघ परिवाराचा अजेंडा होता. त्या मंदिराचे भूमिपूजन मोदींनी करून विरोधकांची तोंडे कायमची बंद केली. मै नहीं खाऊंगा, ना खाने दूंगा’ अशी मोदींची प्रतिज्ञा आहे. म्हणूनच वर्षानुवर्षे भ्रष्टाचार व घोटाळे करून जे गब्बर झाले त्यांना ईडी, आयटी, सीबीआयने घेरले आहे. गैरकारभार केला, तर आता आपली सुटका नाही व आपण कुठेही पळून जाऊ शकत नाही, अशी धडकी अनेकांना त्यांनी भरवली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरी कायद्यात काही आमूलाग्र सुधारणाही त्यांनी केल्या. पण शेतकऱ्यांच्या संघटित विरोधापुढे सरकारला माघार घ्यावी लागली. निवडणूक सुधारणांविषयी काँग्रेसने सत्तेवर असताना वर्षानुवर्षे गप्पा मारल्या. पण मुस्लिमांचे लांगूलचालन आणि जातीपातींवर आधारित व्होट बँक जपण्यासाठी काँग्रेसने निवडणूक सुधारणा कठोरपणे राबवल्या नाहीत. ते धाडस मोदींनी करून दाखवले. विरोधी पक्ष काय म्हणतो यापेक्षा जनहित काय आहे, यावर नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचा कटाक्ष असतो म्हणूनच ते परिणामांची पर्वा न करता धाडसी निर्णय घेत असतात. आधार कार्ड मतदार ओळखपत्राला जोडल्यानंतर एकच व्यक्ती दोन वेगवेगळ्या मतदारसंघात मतदार म्हणून राहू शकणार नाही. मुंबई–दिल्लीत मतदान करून पुन्हा आपल्या राज्यांत मतदान करणारे अनेक महाभाग आहेत. त्यांना आधार कार्डामुळे आता चाप बसेल. मतदार यादी आता पारदर्शी बनेल आणि बोगस मतदारांची नावेही मतदार यादीतून बाद होतील. निवडणूक आयोगाने केलेल्या शिफारशींनुसारच आधार कार्ड मतदार ओळखपत्राला जोडण्याचा आता कायदा झाला आहे. आधारकार्ड मतदार ओळखपत्राला जोडल्यामुळे एक व्यक्ती यापुढे एकापेक्षा जास्त मतदार ओळखपत्रे बाळगू शकणार नाही, म्हणजेच दोन किंवा अधिक मतदारसंघात आपले नाव मतदार म्हणून नोंद करू शकणार नाही.

# पीएस विनोदराज : बालमजुरी ते ऑस्करवारी

**तमिळ दिग्दर्शक पीएस विनोदराज यांचा कुळांगल हा पहिलाच सिनेमा थेट ऑस्करवारीपर्यंत पोहोचला. ३३ वर्षांच्या विनोदराज यांची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली. हा सिनेमा म्हणजे त्यांच्या लहान बहिणीच्या आयुष्याची चित्तरकथा. पण त्याचवेळी तो आजुबाजूचं सामाजिक वास्तव मांडतो. विनोदराज यांचं आयुष्यही तसंच होतं. बालमजूर ते दिग्दर्शक आणि थेट ऑस्करपर्यंतचा त्यांचा प्रवास संघर्षानं भरलेला आहे.**

तमिळ सिनेसृष्टी हा दक्षिण भारतातला एक मोठा उद्योग आहे. तमिळ सिनेमांमधलं संगीत, तिथलं कल्चर, जबरदस्त स्टारकास्ट, सिनेमाची उत्कृष्ट मांडणी आणि बिग बजेट असं सगळंच इथल्या सिनेमात पहायला मिळतं. तिथल्या कलाकारांना मिळणारं मानधन हा मीडिया, सोशल मीडियाच्या दृष्टीने कायमच चर्चेचा विषय असतो. जगभरात कॉलीवूड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सिनेसृष्टीनं संगीतकार ईलैराजा, ए.आर.रहमान, दिग्दर्शक मणीरत्नम, सुपरस्टार रजनीकांत, कमल हसन, शिवाजी गणेशन, एमजीआर, जोसेफ विजय ही अशी बरीच मोठी नावं भारतीय सिनेसृष्टीला दिली. एमजीआर, करुणानिधी, जयललिता असे तमिळ सिनेमातले चेहरे तमिळनाडूच्या राजकीय पटलावर नेते म्हणून यशस्वी ठरले. या सिनेसृष्टीतले कलाकार आपल्या ठाम भूमिकांसाठी कायम चर्चेत असतात. ही भूमिका त्यांच्या सिनेमांमधून दिसत राहते. मारी सेल्वराज, पा.रंजिथ, राजू मुरुगन असे तमिळ दिग्दर्शक ही भूमिका ठामपणे मांडतायत. असंच तमिळ सिनेसृष्टीतले एक नवं नाव म्हणजे दिग्दर्शक पीएस विनोदराज. अवघ्या ३३ वर्षांच्या विनोदराज यांच्या सिनेमाला थेट ऑस्करवारी घडलीय.

घरच्या जबाबदारीसाठी बालमजुरी

तमिळनाडूच्या मदुराई जिल्ह्यातल्या मेलूरच्या खेड्यात विनोदराज यांचा जन्म झाला. घरची परिस्थिति फार बेताची होती. वडलांना दारूचं व्यसन होतं. या व्यसनामुळे त्यांच्या वडलांचं निधन झालं. तेव्हा विनोदराज चौथीत होते. वडलांच्या निधनामुळे वयाच्या ९ व्या वर्षी त्यांच्यावर घरची जबाबदारी आल्याचं त्यांनी ’फिल्म कंपॅनियन’ या वेबसाईटच्या मुलाखतीत म्हटलंय. वडील गेले आणि त्यांचं शिक्षण बंद झालं. मदुराईमधे त्यांना फुलं विकावी लागली. त्या पैशातून जे काही मिळायचं त्यातून ते कुटुंबाचं पोट भरायचे. या काळात त्यांनी प्रचंड गरिबी आणि भुकेचे चटके अनुभवले. रोजिरोटीसाठी त्यांना नकळत्या वयात शहरच्या शहरं पालथी घालावी लागली. पुढे तिरुपूर भागात त्यांनी आपलं कुटुंब आणलं. इथल्याच एका कापड कारखान्यात त्यांनी बालमजूर म्हणून काम केलं. इथलं सगळं जग त्यांना हादरवून गेलं. अगदी लहान वयात त्यांच्या बहिणीचं लग्न झालं होतं. तिच्या नवऱ्याला दारूचं व्यसन होतं. रोज होणारी मारझोड, शारीरिक छळ अशा गोष्टींना कंटाळून ती माहेरी यायची. या सगळ्या गोष्टी विनोदराज यांच्या कानावर पडायच्या. एकदा नवऱ्यानं मारल्यामुळे आपल्या २ वर्षांच्या मुलाला कंबरेवर घेऊन १३ किलोमीटरचं अंतर पायी चालत ती माहेरी आली



होती. अशा प्रसंगांमुळे विनोदराज अस्वस्थ व्हायचे.

डीवीडीच्या दुकानात सिनेमांशी गट्टी

पुढे चेन्नईतल्या एका डीवीडीच्या दुकानात सेल्सपर्सन म्हणून त्यांना काम मिळालं. वेळ मिळेल तसं ते सिनेमा पाहू लागले. हळूहळू त्यांची जागतिक सिनेमाशी ओळख झाली. या डीवीडीच्या दुकानात सिनेमातल्या अनेक कलाकारांचा राबता असायचा. विनोदराज त्यांच्याशी संवाद साधायचे. इथंच त्यांची सिनेमा क्षेत्रातल्या अनेकांशी ओळख झाल्याचं त्यांनी ’फिल्म कंपॅनियन’ला म्हटलंय. डीवीडीच्या दुकानात त्यांची किशोर नावाच्या मित्राशी खास गट्टी जमली. त्यांना वाचनाची आवडही निर्माण झाली. थोडंफार जमेल तसं शिकलेही. या काळात इराणी सिनेदिग्दर्शक माजिद माजिदी आणि अमेरिकन सिनेदिग्दर्शक स्टॅनले कुब्रिक यांच्या सिनेमांनी त्यांना प्रभावित केलं. त्यांचा सिनेमाकडे बघायचा दृष्टिकोन बदलला. हळूहळू सिनेमा, शॉर्टफिल्मविषयीचं त्यांचं ज्ञान वाढू लागलं. पुढे किशोर या मित्राला त्यांनी शॉर्टफिल्मसाठी मदत केली. याच काळात अनेक नव्या लेखकांच्या भेटी होऊ लागल्या. त्यांनीही शॉर्टफिल्म बनवायला सुरवात केली. दुसरीकडे विनोदराज यांच्या निर्मात्यांसोबतच्या ओळखीही वाढत होत्या. २०१४ला तमिळ सिनेदिग्दर्शक ए. सर्गुनम यांनी मंजप्पै फिल्मची निर्मिती केली होती. त्यावेळी विनोदराज त्यांच्या संपर्कात आले. त्यांना काम मिळालं.

४० जणांच्या टीमसोबत सिनेमा

डीवीडीच्या दुकानात काम करताना वाढलेल्या ओळखींचा त्यांना फायदा होऊ लागला. सिनेमेटोग्राफर होणं हे त्यांचं सुरवातीचं स्वप्न होतं. पुढे ए. सर्गुनम यांच्या सिनेमांमधे त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. सिने निर्माते आणि दिग्दर्शक एन. राघवन यांचे सहाय्यक म्हणून त्यांनी कामाला सुरवात केली. तर मनल मागुडी या नाट्यसंस्थेसोबतही त्यांनी दोन नाटकांमधे काम केलं. याच काळात एका विषयावर स्क्रिप्ट लिहायलाचं काम सुरू झालं. ही स्क्रिप्ट त्यांच्या पुढे येऊ घातलेल्या त्यांच्या पहिल्याच कुळांगल सिनेमाची होती. ती स्क्रिप्ट जगभरात त्यांना

**विशेष**

**अक्षय शारदा शरद**

ओळख मिळवून देईल असं त्यावेळी त्यांना वाटलंही नसेल. सुप्रसिद्ध तमिळ अभिनेत्री नयनतारा आणि पटकथा, लेखक, दिग्दर्शक विघ्नेश शिवन यांनी कुळांगलच्या निर्मितीसाठी पुढाकार घेतला. निोदराज यांच्या जन्मगावाच्या जवळ असलेल्या अरिट्टापट्टी गावात सेट उभारला गेला. २०१९ला कडाक्याच्या उन्हात सिनेमाचं चित्रीकरण चालू झालं. प्रचंड उन्हामुळे कॅमेरेही तापायचे पण सिनेमाचं काम चालू राहिलं असं विनोदराज यांनी पीटीआयच्या एका छोटेखानी मुलाखतीत म्हटलंय. या सिनेमासाठी अवघ्या ४० जणांची टीम काम करत होती. सिनेमाला थिएटरमधे शो मिळाले नाहीच तर तो आपण ज्या गावात शुटींग केली. ज्या मातीची ही गोष्ट आहे तिथंच दाखवू हे त्यांनी मनाशी पक्क केलं होतं.

बहिणीची चित्तरकथा ऑस्करवारीला

पीएस विनोदराज यांनी कुळांगल सिनेमाचं स्वतः दिग्दर्शन केलंय. कुळांगलची ऑक्टोबरमधे १४ भारतीय भाषांमधल्या सिनेमांधून थेट ऑस्करवारीसाठी निवड करण्यात आली होती. सरदार उधम सिंग, मंडेला, गोदावरी, कारखानिसांची वारी, शेरशाह अशा बड्या सिनेमांना त्याने मागे टाकलं होतं. या कुळांगलची कथा पीएस विनोदराज यांच्या बहिणीचं आयुष्य चितारते. कुळांगलचा अर्थ खडे. यामधे गणपती, त्याचा मुलगा वेलू, बायको शांती अशी मुख्य पात्रं आहेत. गणपती अचानक एकदा काहीतरी शोधत शोधत थेट आपला मुलगा वेलूच्या शाळेत पोचतो. तिथून ते दोघंही शांतीच्या माहेरी जातात. दोघं पोचेपर्यंत शांती माघारी आपल्या घरी आलेली असते. असं एकदाच नाही तर अनेकदा होत राहतं. गणपतीनं व्यसनाधीन असणं हे शांतीच्या माहेरी जाण्याचं खरं कारण. पण त्यामागे शोषणाचा एक पदर आहे. लक्ष्मी काही पहिल्यांदा माहेरी जात नाही. आणि गणपती आणि वेलूही प्रत्येकवेळी हेच करतात. त्या प्रत्येक फेरीला एकेक खडा वेलू तोंडात ठेवून आणतो आणि घरातल्या एका कोपऱ्यात ठेवतो. तोंडात लाळ तयार होण्यासाठी वेलूला खडा वापरावा लागणं आणि खड्यासारखंच प्रत्येकवेळी तिच्या आईला बाजूला पडावं लागणं यातून कुळांगलचा खरा अर्थ सापडत जातो. गणपती, वेलू यांच्या प्रवासा दरम्यान येणाऱ्या छोट्या छोट्या फ्रेम आजूबाजूच्या दुष्काळाची दाहकता दाखवतात. हे सगळं चितारताना कौटुंबिक हिंसाचार, पुरुषप्रधान मानसिकतेतून शांतीचं होणारं शोषण असं सगळं वास्तवही विनोदराज यांनी या सिनेमातून मांडलंय.

कौतुक संघर्ष आणि आडवळणांचं

कुळांगल या पहिल्याच सिनेमानं विनोदराज यांना मोठं यश मिळवून दिलं. कथेतल्या खरेपणामुळे हे शक्य झालं. आपला खरा–खुरा संघर्ष मांडायचं सिनेमा हे माध्यम होतं असं विनोदराज यांना वाटतंय. त्यांच्याकडे बिग बजेट नसेलही पण कथेत खरेपणा होता. त्यांचा संघर्ष, आलेले अनुभव या सगळ्याच्या मुळाशी असल्यामुळे त्यांचा सिनेमा मनाला भिडू शकला. घरातल्या परिस्थितीमुळे करायला लागलेली बालमजुरी ते ऑस्करवारीपर्यंत पोचलेला दिग्दर्शक हा त्यांचा प्रवास आडवळणांचा राहिला. त्यामुळेच तो साधासोपा नव्हता. त्यात दुःख, वेदना सगळं काही होतं. पण भक्कमपणे पुन्हा उभं राहण्याची इच्छाशक्तीही होती. त्यातही अस्सलपणा होता. तोच त्यांच्या सिनेमाचा विषय बनला. त्यामुळेच विनोदराज यांच्या पहिल्याच सिनेमाची एण्ट्री दणक्यात झाली. कुळांगलची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेलीय. ऑस्करसोबत जगभरातल्या अनेक फिल्म फेस्टिवलमधे या सिनेमानं आपल्या आशय, विषय आणि मांडणीने छाप पाडली. रॉटरडॅम इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमधे कुळांगलला टायगर अवॉर्ड मिळाला. खरंतर हे यश विनोदराज यांच्या संघर्षाचं आणि आडवळणांच्या प्रवासाचं आहे.

# गोष्ट वानर–कुत्र्यांच्या वैराची

**बीड जिल्ह्यातला वानर आणि भटक्या कुत्र्यांमधला वाद शिगेला पोचलाय. सोशल मीडियातून या वादाला हवा मिळाली. कुत्र्यांच्या दोनशेहून अधिक पिल्लांचा जीव या वानरांनी घेतल्याच्या अफवांची सगळीकडे चर्चा झाली. खरंतर प्राण्यांमधे जशी सूडाची भावना आहे, तशीच ती माणसांमधेही आहे. यामागच्या नैसर्गिक कारणांवर संशोधन व्हायला हवं. अशाच सूडभावनांचा शोध घेणारी राज कुलकर्णी यांची फेसबुक पोस्ट ’वर्तमान’च्या वाचकांसाठी प्रसिद्ध करत आहोत.**

बीड जिल्ह्यातल्या माजलगाव तालुक्यातील लवूळ गावात वानरांनी सूडभावनेतून कुत्र्यांना मारलं अशी बातमी वाचायला मिळाली. यात नेमकं तथ्य किती आणि अफवा किती माहीत नाही. पण माकडांच्या वागण्याचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांच्या मते, एका प्राण्याबद्दल दुसऱ्या प्राण्याच्या मनात राग किंवा सूडाची भावना निर्माण होणं नैसर्गिक आहे. इतर प्राण्यांच्या तुलनेत ही भावना माकडांमधे जास्त आढळून येते. काही प्राण्यांमधे जन्मापासूनच वैर असतं, जसं कि उंदीर आणि मांजर. याचं कारण उंदीर हे मांजराचं भक्ष्य आहे हेही असेल. पण साप आणि मुंगूस हे एकमेकांचे भक्ष्य नसूनही पारंपारिक वैरी समजले जातात. यातही किती तथ्य आहे हे माहीत नाही. पण दोन व्यक्तींमधलं वैर किती प्रखर आहे हे सांगण्यासाठी साप–मुंगसाचं वैर’ असे शब्द वापरले जातात.

न्यायाच्या चौकटीतला सूड

माणूस हा माकडापासून उत्क्रांत झालाय. माणसातही प्राण्यांप्रमाणे सूड आणि वैरभावना होत्याच! पण उत्क्रांतीच्या क्रमात त्यांची तीव्रता कमी झाली. मानव सामाजिक प्राणी झाला. तरीही त्याच्यात काही अंशी सूड–वैरभावना असण्याची शक्यता आहे. मानव उत्क्रांत झाला. सामाजिक बनला. समूहानं राहू लागला. समाजव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे सूड किंवा वैरभावनेवर सामाजिक नियंत्रण आलं. पण मनातल्या सूडभावनेचं कमी अधिक प्रमाणात प्रकटीकरण मानव करतच राहीला. मानव सामाजिक झाला तरी त्यानं खून का बदला खून से’सारखे समाजनियमही बनवले. जगभरातले दंड, न्याय याच भूमिकेतून निर्माण झाले असावेत. मृत्यूदंड, देहदंड या शिक्षा जगभरातल्या समाजव्यवस्थेत आहेत. त्याला काही प्रमाणात पर्याय म्हणून धिकदंड, द्रव्यदंड प्रचलित झाले. पण दंड हा समाजव्यवस्थेतला महत्वाचा भाग राहीलेला आहे. प्राचीन काळी गुन्हेगारांना जाहीररीत्या शिक्षा दिली जायची. हे पहायला प्रचंड गर्दी व्हायची. कारण गुन्हेगाराला शिक्षा देताना पाहण्यातही अनेकांना आनंद मिळत असावा. ही भावना आजही सगळीकडं आढळते. न्यायाने जरी शिक्षा मिळाली नाही तरी मनातल्या सूडभावना पूर्ण करण्यासाठी लोक त्या आरोपीला शिक्षा द्यायला आतुर असतात.

समाजाला संशोधनाची गरज

गोमांस असल्याच्या संशयावरून उत्तर भारतात मॉब लिंचिंग झालं. परवा अमृतसर इथं एका गुरूद्वारात एका तरुणाची हत्या करण्यात आली. हे अमानवी’ कृत्य सूड किंवा बदला घेण्याच्याच भावनेनं केलं गेलं होतं पण त्यामागे माणसांचाच हात होता! या दोन्ही हत्यांचं समर्थनही याच भावनेनं काही समाजकटंकांनी केलं होतं. दाभोळकर किंवा गौरी लंकेश यांच्या हत्येवर आनंदी होणारे लोकही अशीच वैरभावना मनी बाळगणारे होते. खरं तर, याच लोकांच्या मनात दाभोळकर, गौरी लंकेश यांना ठार मारायची इच्छा असणार. ती कोणीतरी पूर्ण केली म्हणून यांना आनंद झाला. गांधीजींची हत्या झाल्यावर पेढे वाटणारे लोकही याच मानसिकतेचे आहेत. सूड किंवा वैर ही मानवातली उपजत प्रवृत्ती



आहे का, यावर अजून संशोधन व्हायला हवं. पण नियमित येणारे अनुभव याला दुजोरा देतात. म्हणून तर त्या त्या काळातील विचारवंतांच्या शिकवणीत वैराचे शमन अवैराने होते’, अहिंसा आणि

**आज-काल**

**राज कुलकर्णी**

प्रेम’, मरणांती वैर संपते’ असे विचारउठून दिसतात. कारण समाजात जे नव्हतं तेच त्यांना रूढ करायचं होतं.

महाभारताचं वर्णन सुडाची कथा’

भारतातल्या जैन आणि बौद्ध या धर्माचा पाया हा अहिंसक आणि वैरमुक्त समाजाचा आहे. विशेष म्हणजे हे दोन्ही धर्म वैदिक संस्कृतीतल्या धर्मसुधारणा स्वरूपात विकसित झालेले आहेत. भारतीय लोकांवर साहित्य आणि कलेचा प्रभाव आहे. भारतातल्या दोन प्रमुख धार्मिक ग्रंथांपैकी रामायणात वैरभावनेचं वर्णन आलंय. पण ते मरणांती संपतं असंही सांगितलंय. म्हणजे मृत्यूपर्यंत वैरत्वाला मान्यता दिली आहे. महाभारताचं वर्णनच अनेकांनी सुडाची कथा’ असं केलंय. रामायणात रावण तर महाभारतात दुर्योधन खलनायक आहे. खलनायकाचा अंत हा भारतीयांच्या मनात आनंद देणारा विषय आहे.

सिनेमातून मिळणारं खतपाणी

भारतीयांवर सिनेमाचाही विलक्षण प्रभाव आहे. कधी जनतेच्या वर्तणुकीतून घडलेल्या प्रसंगावर सिनेमे बनतात. कधी सिनेमे बघून जनता त्याचं अनुकरण करते. समाजाचा प्रभाव सिनेमावर पडतो की सिनेमाच्या आभासी दुनियेचा प्रभाव वास्तव जीवनावर, हा चर्चेचा विषय आहे. मारधाड आणि खलनायकाचा अंत दाखवलेल्या सिनेमाचा क्लायमॅक्स प्रेक्षकांना आवडतो. खलनायकाला मार खाताना पाहून खूप आनंद होतो. नायक जेव्हा खलनायकाला मारतो तेव्हा प्रेक्षक उघडपणे मार मार अजून मार’ म्हणताना दिसतात. सिनेमात सासूनं आधी दिलेला त्रास पाहून अत्यंत दु:खी झालेल्या महिलांना नंतर जेव्हा सासूला त्रास होऊ लागतो तेव्हा मनातल्या मनात खूप आनंद होत असतो. कारण तमाम भारतीयांचं मन राग आणि सूडभावनेनं प्रभावित आहे. सूड किंवा बदला घेणं प्रत्येकाला जमेलच असं नाही, पण कोणी बदला घेत असेल तर त्यात समाधान शोधणं हे नैसर्गिक आहे.

सूडाचं राजकारण

राजकारणातही हेच दिसतं. आपण एखाद्या राजकीय पक्षासाठी कष्ट करतो. आपला पक्ष सत्तेत आल्यावर आपल्यालाही त्या कष्टाच्या, त्रासाच्या, वैराच्या शमनाचं सुख किंवा समाधान मिळायला हवं असं वाटतं. विरोधात असताना त्रास झाला म्हणून तुम्ही सत्तेत आल्यावर तसाच त्रास विरोधकांना देत असाल तर, तुमच्यात आणि त्यांच्यात काय फरक राहिला? हा विचार जरी महत्वाचा असला तरी सूडभावना ही मानवी जीवनातली नैसर्गिक भावना आहे. हे वास्तव आहे, जे आदर्शवाद आणि तत्वज्ञानाच्या नावाखाली डावललं जातं. सूड किंवा वैर या मानवी भावनेला राजकीय स्वार्थासाठी वापरलं जातं. एखाद्या सिनेमाच्या कथेसारख्या खोट्या घटना रचून त्या लोकांच्या गळी उतरवल्या जातात. त्यांच्या प्रचारातून सूड घेण्यासाठी लोकांना प्रवृत्त केलं जातं. जगभरातल्या सत्ताधीशांनी सत्ता हस्तगत करण्यासाठी हे केलेलं आहे. त्यांनी रचलेले शत्रू फसवे होते. लोकांमधे पेटवलेली सूड किंवा वैरभावनाही फसवी होती. पण त्यातून आलेला राग मात्र खरा होता. हा राग शांत होणं गरजेचं असतं. त्यामुळं सूड उगवणं हाच जीवनाचा हेतू बनतो आणि मानव मग या सूडभावनेचाच गुलाम बनून जातो. अगदी उत्क्रांतीपूर्व वानरासारखा!

आधुनिक विचारांचे

# वर्तमान




## बीड जिल्ह्याचा कोरोना आकडा शून्यावर

बीड : एकीकडे ओमायक्रॉनच्या भीतीचे सावट असताना बीड जिल्ह्यात मात्र कोरोना रूग्णांचा आकडा शून्यावर आल्याने जिल्हावासियांना दिलासा मिळाला आहे. रविवार, दि.२६ रोजी प्राप्त झालेल्या अहवालामध्ये बीड जिल्ह्यातील १०४९ जणांच्या कोरोनाच्या तपासण्या करण्यात आल्या होत्या. यात सर्वच्या सर्व १०४९ जणांचा तपासणी अहवाल निगेटिव्ह आला आहे. दरम्यान ओमीक्रॉनच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून विविधआरोग्य सुविधांचा आढावा घेत आहे.





# दादा को इतना घुस्सा क्यू आता है?

बारा भोकशाचा पाना

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार तथा महाराष्ट्राचे माजी मंत्री प्रकाश सोळंके यांना त्यांचे चाहते दादा या नावाने संबोधतात. मराठवाड्यात दादांचा दबदबा आजही कायम आहे. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांची कारकीर्द प्रभावी ठरलेली आहे. राज्यमंत्री असताना अनेक विकासाची कामे खेचून आणण्यात दादा यशस्वी झालेले आहेत. आज लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे हरितक्रांतीचे स्वप्न पूर्ण केले आहे. हजारोंच्या हाताला काम दिले आहे. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र सुंदरराव सोळंके यांना विकासपुरूष म्हटले जाते. या विकासपुरूषाचे सुपूत्र म्हणून दादांवर जीव ओवाळून टाकणारी जनता मतदारसंघात आहे. सोळंके घराण्याने महाराष्ट्राच्या आणि जिल्ह्याच्या राजकारणात आपली एक इमेज निर्माण केली आहे. लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष धैर्यशीलकाका सोळंके यांचे राजकारण तर आदर्शवत राहिलेले आहे. असा राजकारणाचा वैभवशाली वारसा जपताना दादा मात्र त्यांच्याकडे येणाऱ्या कोणत्याही कार्यकर्त्याला अलिकडेच्या काळात चिडून बोलत आहेत. ही चिडचिड कशामुळे वाढली याबाबत मात्र कार्यकर्त्यांमध्ये उलटसुलट चर्चा होताना दिसत आहे. या चिडचिडाचा कडेलोट वडवणी नगरपंचायतीच्या निवडणूक जनतेला दिसून आला. या निवडणुकीत मुद्दे बाजूला गेले आणि आरोप-प्रत्यारोपाचा कहर झाला. यात दादांच्याही बोलण्याचा संयम सुटला. हे सोशल मीडियातून आपण सगळ्यांनी पाहीलाच आहे. दादांवर जीवापाड प्रेम करणारे कार्यकर्ते सांगतात. पूर्वीचे दादा आता राहीले नाहीत यामागचे कारण मात्र कार्यकर्त्यांना उमजत नाही. दादांची वाढत चाललेली चिडचीड त्यामागचे कारण खुद्द दादांनाच माहीत. तरीही दादा को इतना घुस्सा क्यू आता है? हा प्रश्न त्यांच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

दाजी

(महाराष्ट्रातील नामांकित लेखक या सदरातून दर आठवड्याला भाष्य करणार आहेत.)

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# राशनच्या काळाबाजारचे लातूर कनेक्शन

## तांदळाचे ४८२ कट्टे जप्त; पोलीसांची धडक कारवाई, काळ्याबाजारला कोणाचा वरदहस्त?

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यात गेल्या कित्येक महिन्यांपासून राशनचा काळाबाजार सुरू आहे. शुक्रवारी पोलीसांनी केलेल्या कारवाईमुळे लातूर कनेक्शन उघड झाले आहे. दरम्यान, माजलगावातील राशनच्या काळ्याबाजाराला कुणाचा वरदहस्त आहे याबाबत तर्कवितर्क काढले जात आहे.

माजलगाव तालुक्यात चालणाऱ्या रेशनच्या काळ्या बाजारातून माल जमा करून तो विक्रीसाठी लातूरला नेत असल्याची खबर उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल जायभाये यांच्या पथकाला लागल्यावरून शुक्रवारी रात्री ४८२ कट्टे तांदळासह ट्रक माजलगाव ग्रामीण पोलिसांनी येथील परभणी टी पॉईंटवर पकडला. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात शुक्रवार, दि.२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. परभणी टी पॉईंट येथील असलेल्या गोडावूनवरून शुक्रवारी रात्री उशिरा रेशनचा तांदूळ लातूर या ठिकाणी विक्रीसाठी नेत असल्याची गुप्त खबर उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल जायभये यांच्या पथकाला लागली होती. त्याअनुषंगाने पो.कॉ.राऊत, पो.कॉ.कागने हे खाजगी गाडीने पेट्रोलिंग करत असताना परभणी टी पॉईंट या ठिकाणी ट्रक क्रमांक एम.एच.४४ व्ही ०१११ हा आढळून आला.

यावेळी पोलिसांनी ड्रायव्हरला ट्रकमधील मालाबाबत विचारणा केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देत होता मात्र त्यास पोलिसी खाक्या दाखविताच रेशनचा तांदूळ असल्याचे कबूल केले. हा माल लातूर या ठिकाणी धोंडगे उदय अ‍ॅग्रो इंडस्ट्रीजला घेऊन जात असल्याचे त्याने सांगितले. हा माल कोणाचा आहे, या बाबत विचारणा केली असता तो शेख अनिस, मोहसीन काझी, शोएब काझी, नूर, अत्तार, शेख बाबा रा.माजलगाव या लोकांचा असल्याचेही त्याने सांगितले. यावरून ग्रामीण पोलिसांनी तालुका पुरवठा अधिकारी यांच्याशी संपर्क करून सदर मालाची चौकशी केली असता सदर तांदूळ रेशनचा असल्याची खात्री पटली.



### प्रशासन मुग गिळून गप्प का?

बीड जिल्ह्यात जवळपास साडेचार लाख कुटुंब ऊसतोडीसाठी परजिल्ह्यात जातात. या कुटुंबाचे सहा महिन्यांचे धान्य गावात कोणाकडे जाते आणि कुठे जाते. याचा अद्याप ताळमेळ लागलेला नाही. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यानंतर राशनचा काळाबाजार जास्त संख्येने वाढत राहतो. याबाबत प्रशासन मुग गिळून का गप्प आहे? हा खरा सवाल आहे. ऊसतोड मजुरांच्या तोंडातील घास हिरावून घेणाऱ्या दोषींवर कारवाई व्हावी अशी मागणी जोर धरत आहे.

ट्रकमध्ये असलेली ५० किलो वजनाचे ४८२ तांदुळाचे कट्टे ज्याची किंमत रूपये ३ लाख ३७ हजार ४०० तसेच १४ टायरचा ट्रक अंदाजे किंमत २० लाख आहे. असा एकूण २३ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, रेशनचा काळ्या बाजरीचे मोठे घबाड पोलिसांच्या हाती लागले. रेशनचा काळा बाजार करणाऱ्या माजलगावातील अनेकांचे धाबे दणाणले असून एकच खळबळ माजली आहे. यात मुख्य सूत्रधार समोर येणे आवश्यक आहे. अंबाजोगाई येथील पोलीस शिपाई नितीन आतकर यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलिसात अत्यावश्यक सेवा कायदा कलम ३, ७ नुसार आरोपी ड्रायव्हर शेख इस्माईल शेख मतीन रा.पिंपळा धायगुडा ता.अंबाजोगाई यास अटक करण्यात आली. पुढील तपास ए.पी.आय.व्ही.एस. जोनवाल हे करत आहेत.

## फास्टट्रॅकन्यूज

### माजलगाव धरणात ९७ टक्के पाणीसाठा

माजलगाव : यंदा धरण कार्यक्षेत्रात जोरदार पाऊस पडल्याने अद्यापही माजलगाव धरणात ९७ टक्के पाणीसाठा आहे.



सद्यस्थितीला ९७ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती माजलगाव धरण शाखा अभियंता बी.आर.शेख यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली. मागील तीन वर्षापासून धरण कार्यक्षेत्रात होत असलेल्या जोरदार पावसामुळे सलग तिसऱ्या वर्षी माजलगाव धरण शंभर टक्के भरले आहे. धरणामध्ये सध्या ९७ टक्के उपयुक्त पाणीसाठा असून रब्बी हंगामाकरिता शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहेत. माजलगाव धरणामुळे तालुक्याचे सिंचन क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सलग तिसऱ्यांदा माजलगाव धरण भरले असल्याने ऊसाच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली असून धरणातील मुबलक पाणीसाठ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटच्या संचालकपदी राहुल महाडिक

माजलगाव : राष्ट्रीय स्तरावरील




फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटच्या २०२१-२०२५ या कार्यकाळासाठी संचालक मंडळ निवडणुकीत राहुल महाडिक यांच्यासह १७ जणांची संचालक म्हणून बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे. फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटची १७ रोजी पुणे येथील सिम्बॉयसिस हायस्कूलमध्ये सर्वसाधारण सभा पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी मिलिंद सोबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत एकूण २१ जणांनी अर्ज दाखल केले. त्यामध्ये शेवटी ४ जणांनी माघार घेतली म्हणून निवडणूक बिनविरोध पार पडली. या निवडणुकीत राहुल महाडिक यांच्यासह १७ जणांची संचालक म्हणून बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

## रूईकर कुटुंबीयांना ५० हजारांची मदत

प्रतिनिधी

बीड : शिवसेना नेत्या तथा विधान परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ.निलम गोऱ्हे यांनी तत्परता दाखवून बीड येथील शिवसेना माजी नगरसेवक सुमंत रूईकर यांच्या कुटुंबीयांना ५० हजारांची मदत जाहीर केली आहे.



मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्यांना दीर्घायुष्य लाभो, यासाठी बीड मधील एका कट्टर शिवसैनिकांनी पदयात्रा काढली होती. या पदयात्रे दरम्यान या शिवसैनिकाचे निधन झाले आहे. सुमंत रूईकर असे या शिवसैनिकांचे नाव असून ते बीड शहरातील माजी नगरसेवक आहेत. ठाकरे यांना दीर्घायुष्य लाभो यासाठी त्यांनी बीड ते तिरुपती अशी पायी पदयात्रा काढली. तिरुपतीकडे जाताना त्यांना ताप आल्याने कर्नाटकातील रायचूर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. प्रकृती खालावल्याने सुमंत रुईकर यांचे शनिवारी दुपारी निधन झाले. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त केली जातेय. २०१९ मध्येही उद्धव ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत, यासाठी रूईकर यांनी बीड ते तिरूपती बालाजी अशी पायी यात्रा पूर्ण केली होती. त्यांच्या निष्ठेचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कौतुक केले होते. दरम्यान, सुमंत रूईकर यांच्या निधनामुळे बीडसह राज्यातून हळहळ व्यक्त केली जात आहे. रूईकर यांच्या कुटुंबीयांचे दूरध्वनीवरून डॉ.निलम गोऱ्हे यांनी सांत्वन केले असून तात्काळ ५० हजार रूपये देणार असल्याची घोषणा केली आहे.

## पाम आर्क रेस्टॉरंटला केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या शुभेच्छा

प्रतिनिधी

पुणे : येथील माळथान फाटा, शिक्रापूर येथे सुरू करण्यात आलेल्या पाम आर्क गार्डन रेस्टॉरंटला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. हॉटेल व्यवसायात आपली भरभराट होवो, असे शुभेच्छा संदेशात मंत्री आठवले यांनी म्हटले आहे.



शुभेच्छा संदेशात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात आज स्पर्धा खूप वाढलेली आहे.

मात्र या स्पर्धेच्या युगात गुणवत्ता आणि दर्जा टिकून ठेवा, असे आवाहनही मंत्री आठवले यांनी केले आहे. या हॉटेलचे संचालक रविंद्र ज्ञानेश्वर भुजबळ यांना शुभेच्छा संदेश पाठवून पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या आहेत.

# दिव्यांग शंकर म्हस्केंची घरकुलासाठी फरफट सुरूच

## खोडस येथील प्रकार; २० वर्षापासून लाभाची प्रतीक्षा

प्रतिनिधी

धारूर : तालुक्यातील खोडस येथील शंकर संभाजी म्हस्के या दिव्यांग ग्रामस्थाला अद्याप घरकुलाचा लाभ मिळाला नसून गेली १५-२० वर्ष घरकुलासाठी म्हस्के यांची फरफट सुरू आहे. दरम्यान, तीन वेळा त्यांची घरकूला संबंधीची फाईल रद्द करण्यात आली आहे. याची कारणे प्रशासन द्यायला तयार नाही. आता चौथ्यांदा म्हस्के यांनी रमाई आवास योजनेसाठी अर्ज दाखल केला आहे.

धारूर तालुक्यातील खोडस येथील शंकर म्हस्के दिव्यांग आहेत. त्यांचा पाय अधू असल्याने ते चालू शकत नाहीत. उपजीविकेचे कोणतेही साधन नसल्याने त्यांची परिस्थिती हलाखीची आहे. गेली कित्येक वर्ष म्हस्के यांनी घरकुलासाठी प्रतीक्षा केलेली आहे. गेली १५ ते २० वर्षापासून ते घरकुलाचे वंचित राहिलेले आहेत. तब्बल ३ वेळा त्यांचा अर्ज रद्द ठरवण्यात आला आहे. शासनाने कोणते निकष लावून त्यांचा आवास योजनेचा अर्ज रद्द ठरविला, याचे कोडे उलगडत नाही. दुसरीकडे बनावट लाभार्थ्यींना स्वतःच्या इमारती असतानाही घरकूलच्या यादीत नावे समाविष्ट असतात. मात्र शंकर म्हस्के सारखे खरे लाभार्थी वंचित राहिले आहेत, याकडे गाढ झोपलेल्या प्रशासनाला लक्ष द्यायला वेळ नाही. या प्रकारामुळे संताप व्यक्त केला जात आहे.



खोडस : आपल्या घरासमोर उभे असलेले दिव्यांग शंकर म्हस्के.



धारुर : पंचायत समितीचे उपसभापती प्रकाश कोकाटे यांच्याकडे आपली कैफीयत मांडतांना शंकर म्हस्के.

### 'शासन डोळे झाकून अर्ज मंजूर करते का?'

आपल्यावर झालेल्या घरकुलाच्या अन्यायाबाबत कैफियत मांडताना शंकर म्हस्के 'वर्तमान'शी बोलताना म्हणाले, अनेक राजकीय लोकांनी केवळ आश्वासने दिली. मात्र अद्याप घरकूलचा प्रश्न मार्गी लागला नाही. शेवटचा आशावाद म्हणून धारूर पंचायत समितीचे उपसभापती प्रकाश कोकाटे यांच्याकडे माझा प्रश्न मांडला आहे. ते न्याय मिळवून देतील असे वाटते. मी दिव्यांग असून परिस्थिती हलाखीची आहे. घरकुलाचे अर्ज प्रशासनाने डोळे झाकून मंजूर न करता, डोळे उघडून माझ्यासारख्या गरजवंताला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती म्हस्के यांनी केली.

### शंकर म्हस्केंना न्याय मिळवून देणार : भीमराव लाखे

खोडसचे सरपंच भीमराव लाखे म्हणाले, शंकर म्हस्के यांची घरकुलाची फाईल मंजूर करण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर सर्वोतोपरी प्रयत्न करू. ग्रामपंचायतीचा ठराव घेवून दिव्यांग असलेल्या शंकर म्हस्केंना प्राधान्य क्रमाने न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन 'वर्तमान'शी बोलताना दिले. दरम्यान, शंकर म्हस्के यांनी आपली व्यथा माझ्याकडे अगोदरच मांडली असती तर घरकुलाचा प्रश्न यापूर्वीच मार्गी लागला असता, असे लाखे यांनी सांगितले.

### 'असे कित्येक शंकर म्हस्के लाभापासून वंचित'

प्रशासन काम करत असताना बऱ्याचदा खऱ्या लाभार्थीवर अन्याय होतो. याचे मोठे उदाहरण म्हणजे खोडस येथील दिव्यांग शंकर म्हस्के होय. म्हस्के यांना रमाई आवास योजनेअंतर्गत घरकूल मिळवून देणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हास्तरापर्यंत पाठपुरावा करू. प्रशासनाच्या नजरेत हा विषय गंभीरपणाने लक्षात आणून देवू, असे कित्येक शंकर म्हस्के आजही लाभापासून वंचित आहेत. अशांचाही शोध घेणे गरजेचे आहे, अशी प्रतिक्रीया धारूर पंचायत समितीचे उपसभापती प्रकाश कोकाटे यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.

# शुभम डाकेंच्या रूपाने युवासेनेला मिळाला क्रियाशील जिल्हाप्रमुख



▶ भगीरथ तोडकरी

बीड : शिवसेनेशी एकनिष्ठ म्हणून डाके कुटुंबीय सर्वपरिचित आहे. अनिलराव डाके यांचे चिरंजीव शुभम डाके यांची युवासेनेचे नवे बीड जिल्हाप्रमुख म्हणून नुकतीच नियुक्ती झाली आहे. युवासेनेला तरूण तडफदार आणि क्रियाशील जिल्हाप्रमुख मिळाला आहे, अशी भावना शिवसेनेतून व्यक्त होत आहे.

श्वास शिवसेना, ध्यास शिवसेना या विचाराने प्रेरित झालेले शुभम अनिलराव डाके युवासेनेच्या माध्यमातून सक्रीय काम करत आहेत. शिवसेना ही विचारधारा आणि दिवंगत बाळासाहेब ठाकरे, शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या जाज्वल्य विचारांची ओळख वडिल अनिलराव डाके यांच्यामुळे झाली. आज आदित्य ठाकरे यांच्या आदेशानुसार युवासेनेत सक्रीय कार्य करत असल्याचे नवनियुक्त युवासेना बीड जिल्हाप्रमुख शुभम डाके यांनी 'वर्तमान'शी



सांगितले. शिवसेनेच्या सच्चा पाईक म्हणून शुभम डाके यांनी अल्पावधीत व्यापक प्रमाणात कार्य उभे केले आहे. कोरोना काळात रूग्णांना रक्ताचा तुटवडा भासू नये, यासाठी रक्तदान शिबीर घेऊन अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले. निराधार, हातावर पोट असलेल्या अनेक कुटुंबांना किराणा साहित्य वाटप करून शुभम डाके यांनी युवकांसमोर नवा आदर्श प्रस्थापित केला आहे. वेळोवेळी मुकबधिर मुलांच्या शाळेत अल्पोपहाराचे वाटप करून वंचित घटकांच्या समस्या सोडवण्यासाठी शुभम डाके सदैव तत्पर असतात. शिवसेनेच्या माध्यमातूनच समाजाचे प्रश्न धसास लागू शकतात. शिवसेना हाच प्रामाणिक पक्ष असल्याने आपण शिवसेनेत सक्रीय झाल्याचे डाके यांनी 'वर्तमान'शी बोलताना सांगितले. माजलगाव शहर आणि परिसरात आज शुभम डाके यांनी पक्ष बांधणी सुरू केली आहे. त्यांच्याकडे शिवसेना या विचारधारेची नवी फळी तयार आहे. आपणास युवासेनेच्या माध्यमातून जिल्हाभरात शिवसैनिकांचे जाळे विनायचे आहे, असेही जिल्हाप्रमुख डाके यांनी सांगितले. बेरोजगार युवकांचे प्रश्न सोडवण्यासाठी शुभम डाके यांनी संपर्क कार्यालय सुरू केले आहे. १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मॉक टेस्ट घेण्यात आली, त्यात ३३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आदित्य ठाकरे यांच्या स्वप्नातील युवक सत्यात उतरविण्यासाठी अहोरात्र शिवसेना, युवासेना बांधणीसाठी काम सुरू केले आहे. तळागाळातील माणूस केंद्रस्थानी मानून काम सुरू आहे. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वामुळे शिवसेनेकडे युवक मोठ्या प्रमाणात वळत आहेत, असेही जिल्हाप्रमुख शुभम डाके म्हणाले. शिवसेनेची विचारधारा आणि भगवा ध्वज खांद्यावर घेवून निघालेल्या शुभम डाके यांना पक्षाने सन्मानजनक संधी दिली आहे. त्यामुळे डाके यांच्याकडून व्यापक संघटन वाढविण्याची आशा निर्माण झाली आहे.

# दि सिद्धेश्वर अर्बनची ५६ वी वार्षिक सभा उत्साहात

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील अग्रगण्य संस्थांपैकी एक असलेल्या दि सिद्धेश्वर अर्बन को-ऑप क्रे.सो.लि माजलगाव या संस्थेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि.२५ डिसेंबर रोजी अध्यक्ष सुनिल रूद्रवार यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन पद्धतीने संस्थेच्या कार्यालयात अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी संस्थेच्या सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर केला. दरम्यान, संस्थेचा नेट एन.पी.ए.३.९५% इतका कमी झाल्यामुळे संस्थेला 'अ' वर्गाचे मानांकन प्राप्त झाले, असल्याची माहिती अध्यक्ष सुनिल रूद्रवार यांनी दिली.

ऑनलाईन पद्धतीने पार पडलेल्या या सभेला मोठ्या प्रमाणात सभासदांनी आपला सहभाग नोंदविला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुनिल रुद्रवार यांनी दि.३१.मार्च २०२१ अखेरचा संस्थेचा ताळेबंद जाहीर करताना संस्थेची आर्थिक गुणवत्ता विशद करताना सांगितले की, संस्थेच्या संचालक मंडळाने सन २०१५ ते दि.३१ मार्च २०२१ या काळात संस्थेची उच्चत्तम



प्रगती करून संस्थेचे खेळते भागभांडवल २२ कोटीने वाढविले आहे तर संस्थेच्या भागातील ठेवीत एकूण रूपये १८ कोटीने वाढ झालेली आहे. याच दरम्यान संस्थेने १२ कोटी रूपयांची कर्जवाढ केलेली आहे. त्यामुळे संस्थेचा गुणात्मक दर्जा वाढून संस्थेला सतत 'अ' वर्गाचे मानांकान प्राप्त आहे. ३१ मार्च २०२१ अखेर संस्थेला ५६.६४ लक्ष रूपयाचा निव्वळ नफा झाला असून, संस्थेचे खेळते भाग भांडवल ४६ कोटी ९५ लाख रूपये झाले आहे. संस्थेच्या नफ्यात ४०.७७ लक्ष रूपयांनी वाढ झाली आहे. संस्थेचे सभासद, हितचिंतक, ग्राहक हे संस्थेत करीत असलेला व्यवहार हे संस्थेवरील विश्वासाचे गमक असल्याचे नमूद करून सभासदांचे आभार व्यक्त केले. तसेच १० टक्के लाभांश वाटपाची शिफारस त्यांनी यावेळी केली. तसेच तज्ज्ञ मार्गदर्शक आमदार प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनात संस्था उत्तरोत्तर प्रगती साधत असून इमारतीसाठी खरेदी केलेल्या जागेत इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास असल्याचे सांगत संस्थेचा नवीन इमारत वास्तूचा लवकरच शुभारंभ होईल असेही त्यांनी सांगितले. संस्थेचे उपाध्यक्ष शेख माजिद, व्यवस्थापक बाळकृष्ण बोबडे यांनी उपस्थित सभासदांचे आभार व्यक्त करून सभेची सांगता केली.

## पौर्णिमा जिनिंगवर दरोडा

### चोरट्यांनी केले ४८ लाख लंपास

▶ प्रतिनिधी

परळी : पौर्णिमा कॉटन जिनिंगमधील वीज बंद केली. त्यानंतर सीसीटीव्हीचे कनेक्शन तोडले. खोल्यांचे दरवाजे बाहेरुन बंद केले व रोखपालाच्या उशाखालील चावीच्या सहाय्याने कपाट व तिजोरी उघडून ४८ लाख रूपयांची रोकड लंपास करण्यात आली. २६ डिसेंबर रोजी पहाटे परळी तालुक्यातील कौडगाव घोडा येथील जिनिंगमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला.

ओंकार उत्तमराव खुर्पे (रा.नवीन बसस्थानकासमोर, माजलगाव) हे उद्योजक असून त्यांची कौडगाव घोडा (ता.परळी) येथे पौर्णिमा कॉटन जिनिंग आहे. सलग दोन दिवस सुट्या आल्याने २४ डिसेंबर रोजी पौर्णिमा कॉटन जिनिंगचे रोखपाल अशोक भीमराव सोळंके व निलेश विलास देशमुख यांनी परळी येथील एसबीआयमधून पौर्णिमा कॉटन जिनिंगच्या खात्यातून ५० लाख रूपये काढून आणले होते. यातील काही रक्कम त्याच दिवशी शेतकऱ्यांना वाटप व ४५ लाख रूपये मुख्य लोखंडी तिजोरीत तर २ लाख ७८ हजार ४०० रूपये लोखंडी कपाटात ठेवले होते. रोखपाल साळुंके व इतर कर्मचारी तेथेच झोपी गेले. दरम्यान, मध्यरात्री सव्वा बारा वाजता ते सव्वातीन यादरम्यान रोखपाल सोळंके यांच्या उशाखालील चावीने कपाट व मुख्य तिजोरी उघडून चोरट्याने ४७ लाख ७८ हजार ४०० रूपये इतकी रोकड लंपास केली. पहाटे सव्वातीन वाजता सोळंके यांना जाग आली तेव्हा त्यांच्या उशाखाली चावी गायब असल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी काही खोल्यांना बाहेरुन कड्या लावल्या होत्या. वीज बंद करुन सीसीटीव्हीचे कनेक्शनही तोडलेले आढळून आले. ओंकार खुर्पे यांच्या फिर्यादीवरुन सिरसाळा ठाण्यात २७ रोजी पहाटे गुन्हा नोंद करण्यात आला. सहायक निरीक्षक प्रदिप एकशिंगे यांनी घटनास्थळी भेट दिली. चोरट्यांनी रोख रक्कमेसह बँक पासबुक व चावी देखील लंपास केली. सुरूवातीला केवळ कपाटातील रक्कम गायब असल्याचे निदर्शनास आले. मात्र, लोखंडी तिजोरीची चावी चोरट्यांनी लांबविल्याने त्यातील रक्कम सुरक्षित आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी ड्रील यंत्राने ती तोडली तेव्हा ती रिकामी आढळली.








आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.